# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था )
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

Email : **competitiveupsc@barti.in,** Website : https//:barti.maharashtra.gov.in

## बार्टीमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२० उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरीता मुख्य परीक्षा २०२० साठी आर्थिक सहाय्य योजना

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचे जे उमेदवार संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२० उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांना मुख्य परीक्षेकरिता एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल.

- **योजनेचे स्वरूप**:-
  पात्र अनुसूचित जातीच्या उमेदवारांना एकरकमी रक्कम **रु. ५०,०००/-** आर्थिक सहाय्य बार्टी मार्फत दिले जाईल.
- **पात्रता**:- १. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.
  २. उमेदवार संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२० उत्तीर्ण झालेला असावा.
- **निकष**:-
  १. बार्टी मार्फत संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा पूर्व परीक्षेमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी आर्थिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  २. बार्टी मार्फत दिल्ली येथे प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  ३. बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील सहा महसूल विभागामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  ४. बार्टी मार्फत यशदा, पुणे आणि भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र (SIAC – मुंबई , Pre IAS – कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती ) येथे मुख्य परीक्षेच्या तयारीकरिता प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  ५. विद्यार्थ्याने या वर्षी सदर मुख्य परीक्षेकरिता केंद्र वा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- बार्टीने खालील लिंकवर उपलब्ध करून दिलेला अर्ज डाऊनलोड करून अर्जासोबत जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),उमेदवारांचे बँक खाते क्र. (पासबुकच्या प्रथम पृष्ठाची प्रत) व त्यासोबत संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२० चे प्रवेश पत्र (Admit Card) ची प्रत इ. सर्व स्कॅन करून "बार्टी" च्या **competitiveupsc@barti.in** या ई-मेल वर **दि. ०८/१२/२०२० रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत अर्ज स्विकारले जातील.**

पात्र उमेदवारांनी अधिक माहिती साठी **०२०-२६३३ ३५९६ / २६३३ ३५९७** येथे संपर्क साधावा.

अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **https://barti.maharashtra.gov.in > NOTICE BOARD > BARTI-UPSC-Civil Services (Main) Examination २०२० Financial Assistance Scheme Online Application Form**

## अर्ज करण्याची अंतिम तारीख – दि. ०८/१२/२०२०

अधिक माहितीसाठी **https://barti.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर भेट द्या.

धम्मज्योती गजभिये
**महासंचालक ,बार्टी**